**बिंदुमाधव कट्टी निबंध स्पर्धा**

# अनुक्त व्याधी निदान तथा चिकित्सा विचार

**अनुक्त व्याधी विचार ही काळाची गरज**

“डॉक्टर मला व्हायरल इन्फेक्शन झाले आहे. आमच्या नेहमीच्या डॉक्टरांकडून औषधे आणली पण अजूनही त्रास होत आहे. आयुर्वेदात या नवीन व्हायरस साठी काही औषध आहे का जे घेऊ शकेन?” या प्रश्नापासून ते पटकन पूर्ण बरे वाटल्यावर “या निरनिराळ्या आजारांवर आयुर्वेद काम करतो हे माहितच नव्हते हो..” हे बदल आपण अनुभवत असतो. आयुर्वेदाकडे नव्याने आलेल्या रुग्णांकडून हे प्रश्न ऐकायची आणि त्यावर समाधानकारक उत्तरे देऊन पेशंटला सर्व प्राथमिक चिकित्सेसाठी आयुर्वेद घेण्यासाठी प्रवृत्त करण्याची सुद्धा आपल्याला एक वैद्य म्हणून सवय असते.

“आयुर्वेद आजच्या काळात कसा वापरणार? ते तर इतिहासजमा झाले. आयुर्वेदाला त्या काळी बॅक्टेरिया, व्हायरस हे सूक्ष्म जीवाणू, नवनवीन शोध, कॅन्सर, डायबेटिस, थायरॉईड आणि असे अनेक आजार, त्या त्या सूक्ष्म जीवांवर काम करणारी चिकित्सा पद्धती ही माहिती नसल्याने त्याचा वापर आत्ताच्या नवीन व्याधींमध्ये करणे अशक्य आहे..” असा काहीसा एक अपप्रचार जनमानसात रुजवला जाताना दिसत आहे. या सर्व गोष्टींना तोंड देऊन आयुर्वेद उत्तम पद्धतीने विविध व्याधींमध्ये काम करताना दाखवायचा असेल तर आपल्याला आत्ताच्या काळानुसार संहितांचा अर्थ घेता येणे गरजेचे आहे. आता दिसणारे व्याधी जसेच्या तसे संहितांमध्ये वर्णन केलेले आढळले नाहीत तरीही “रीडिंग बिट्विन द लाईन्स” म्हणजेच सांगितलेल्या सूत्राचा अर्थ समजून आपल्याकडे आलेल्या पेशंटमध्ये त्याचा वापर करू शकणे हे नवीन आजारात आयुर्वेद चिकित्सा देताना फार गरजेचे ठरते. त्या संहितांची आत्ताच्या व्याधींमधील उपयोगिता, सूत्रस्थानापासून विविध व्याधींमध्ये सांगितली गेलेली सूत्रे याचा सूक्ष्म अभ्यास, समोर आलेल्या रुग्णाचे हेतू, लक्षण आणि संप्राप्तिनुसार दोष धातू मल यांच्यातील अंशांश भाव याद्वारे चिकित्सा देऊ शकतो. अनुक्त व्याधींवर चिकित्सा देत असताना मूळ आहार विहार इत्यादि अभ्यास, वेगवेगळी चिकित्सा द्रव्य गुणधर्म, औषधी कल्पांमध्ये असलेल्या घटकांचा अभ्यास आणि भैषज्य कल्पनांची माहिती असणे ही तर अध्याहृत असलेली गोष्ट आहे.

**अनुक्त व्याधी**

चरकाचार्यांनी संहिता लिहिताना संहितेचा विस्तार आटोक्यात रहावा तसेच नवीन युगाप्रमाणे बदलत जाणारे आजार लक्षात घेता विकार हे मोजता येणार नाही इतक्या विविध प्रकारचे आहेत हे सांगून ठेवले आहे. कुपित झालेला दोष हा स्थानानुसार विविध व्याधी उत्पन्न करत असल्याने प्रत्येक व्याधीला नाव देणे शक्य नाही. या सगळ्यांचा

समावेश "अनुक्त व्याधी" या वर्गा अंतर्गत केला जातो. "अनुक्त व्याधी" म्हणजे असे आजार जे संहितेत तसेच्या तसे आणि विस्तृतपणे सांगितलेले नाहीत.

**विकारनामाकुशलो न जिह्लीयात् कदाचन|न हि सर्वविकाराणां नामतोऽस्ति ध्रुवा स्थितिः||**

**स एव कुपितो दोषः समुत्थानविशेषतः|स्थानान्तरगतश्चैव जनयत्यामयान् बहून्|| चरक सूत्रस्थान १८/४४**

**विकाराःपुनरपरिसङ्ख्येयाः,प्रकृत्यधिष्ठानलिङ्गायतनविकल्पविशेषापरिसङ्ख्येयत्वात्|| चरक सूत्रस्थान २०/३**

सध्याच्या काळात अनेक कारणांमुळे असे विविध आजार उद्भवताना आपण पाहत आहोत. हे प्रत्येक आजार आयुर्वेद शास्त्रांमध्ये निदानस्थानात वर्णन केलेल्या व्याधीच्या साच्यामध्ये तंतोतंत बसतीलच असे नाही. चार वर्षांपूर्वी येऊन गेलेल्या कोव्हिड साथीचे आपण सर्व जण साक्षीदार आहोत. याची लक्षणे ही श्वास आणि ज्वर या दोन्हीमध्ये असल्याने उपचार करताना चिकित्साकल्प हे दोन्ही व्याधींमधील वापरले गेले. रेमडेसिवीर, मोठ्या प्रमाणावर दिले गेलेले स्टिरॉइड आणि ICU मध्ये रुग्ण भरती असताना थंड एसी मध्ये वाढत जाणारा कफ आणि वाताचा मार्गवरोधजन्य श्वास वेग या सगळ्याचा विचार चिकित्सा करताना करणे भाग पडले. आता आपल्यासमोर सगळ्यात मोठे आव्हान हे रुग्ण घेत असलेली पाश्चात्य औषधे, त्यातून येणारे तोटे आणि उद्भवणारी नवनवीन लक्षणे हे आहे. आपल्याकडे आयुर्वेदात तंतोतंत वर्णन न केलेल्या व्याधीची चिकित्सा करताना व्याधी संप्राप्ति भंग, लक्षण शांती आणि रुग्णांची पाश्चात्य औषधांनी होणारी हानी भरून काढणे हा त्रिकोणी विचार करत औषध द्यायला लागते. नवीन व्याधीसाठी रुग्णपरीक्षण करताना निदानपंचक, हेतूंपासून विचार करून लक्षणसमुच्चयामधील दोषदूष्यसंमूर्च्छना, ते व्याधी लक्षण उत्पन्न होताना घडत गेलेली संप्राप्ति आणि मग दिसणारी लक्षणे असा विचार करून चिकित्सा करण्यासाठी उपयोगी असे विविध परीक्ष्य भाव वर्णन केले आहेत. ज्ञानपूर्वक कर्म हे कुठल्याही चिकित्सा उपचाराच्या दरम्यान करत राहणे आवश्यक आहे.

**ज्ञानपूर्वकं ही कर्मणां समारम्भं प्रशंसन्ति कुशलाः||चरक विमान ८/६८**

**रोगमादौ परीक्षेत ततोऽनन्तरमौषधम्| ततः कर्म भिषक् पश्चाज्ज्ञानपूर्वं समाचरेत्|| चरक सूत्रस्थान २०/२०**

आधी रोगाचे परीक्षण करावे मग औषधाचा विचार करावा असे आचार्य सांगून गेले आहेत. शुगर कमी करण्यासाठी आलेल्या रुग्णामध्ये ग्रहणी, अतिशय कृश असलेल्या व्यक्तीमध्ये असलेल्या कोलेस्टेरॉल रुग्णामध्ये चिंताजन्य रसधातू स्रोतस दुष्टी, कॅन्सर रुग्णांमध्ये विदाह उत्पन्न करणारे विविध हेतू तसेच विषाचा विचार, हिमोग्लोबीन कमी असलेल्या रुग्णांमध्ये जीर्ण आम्लपित्त अशी विविध निदाने सध्याच्या व्याधींना तोंड देताना केले जातात आणि आयुर्वेदीय निदान आणि चिकित्सा पद्धतीचा सुंदर वापर या सगळ्यांमध्ये होताना दिसतो.

**आतुर परीक्षण**

रुग्ण दवाखान्यात आल्यावर त्रिविध(दर्शन, स्पर्शन, प्रश्न), अष्टविध (नाडी , मल, मूत्र, जिव्हा, शब्द, स्पर्श, दृक, आकृती) आणि दशविध परीक्षेने त्याची तपासणी आपण करतो. चरकोक्त दशाविध परीक्षेमध्ये प्रकृती, विकृती, सार, संहनन, प्रमाण, सात्म्य, सत्व, आहार शक्ती, व्यायामशक्ती, वय परीक्षण याचा चिकित्सा करताना रुग्णबल ज्ञानासाठी उपयोग होतो. आतुर परीक्षण करताना पुढील परीक्ष्य भावांचा विचार वैद्याने करावा.

**तस्मादातुरंपरीक्षेतप्रकृतितश्च, विकृतितश्च, सारतश्च, संहननतश्च, प्रमाणतश्च, सात्म्यतश्च, सत्वतश्च, आहारशक्तितश्च, व्यायामशक्तितश्च, वयस्तश्चेति, बलप्रमाणविशेषग्रहणहेतोः..| चरक विमान ८**

**प्रकृती** परीक्षणाचे विविध मुद्दे चरक संहितेमध्ये सांगितले आहेत हे आपण जाणतो. सहज, सात्म्यज आणि युक्तिकृत असे तीन प्रकारचे बल असते. रुग्णाचा आहार विहार हा सतत वेडावाकडा, अनियमित असेल, त्याचा व्यायाम नसेल तर सहज बल जरी चांगले असले तरी ते फार काळ टिकत नाही. या उलट एखादा वात प्रकृतीचा सदातुर रुग्ण स्वतःची काळजी घेत असेल, पथ्य सांभाळत असेल तर त्याला झालेला व्याधी हा आपल्या औषधांनी पटकन आटोक्यात यायला मदत होते.

**सत्व परीक्षा** ही रुग्णाला काय प्रकारची औषधे द्यावी यासाठी उपयोगी ठरते. हीन सत्व रुग्णांना तपासताना सुद्धा आश्वासन आणि सत्वावजय चिकित्सा वापरायची गरज पडते. **आहारशक्ती** ही अग्निवरून समजते. अभ्यवहरण शक्ती म्हणजे अन्न ग्रहण करण्याची क्षमता आणि जरण शक्ती म्हणजे अन्न पचवायची क्षमता यावरून रुग्णाच्या अग्निचा अंदाज घ्यावा. **व्यायाम आणि वय** याचे परीक्षण हे प्रामुख्याने चिकित्सा देताना निवडायची औषधे आणि रुग्णाचे शरीर बल याचा अंदाज घ्यायला उपयोगी ठरतात.

**दर्शन, स्पर्शन आणि प्रश्न** परीक्षेत वैद्यांचे खरे कसब असते. अनेक रुग्ण बाहेरुन आपल्यापर्यंत येत असताना तसेच नुसते बसलेले असताना देखील दर्शन परीक्षा आणि प्रत्यक्ष स्पर्श परीक्षा यावरून एका ढोबळ निदानापर्यंत पोचणे आणि मग त्याला संलग्न प्रश्न विचारणे यासाठी निदान स्थान वारंवार डोळ्याखालून घडले आवश्यक असते. रुग्ण केबिनमध्ये आल्यापासून त्याच्या त्वचा, केस डोळ्याखालील काळेपणा, अंगावर असलेला पिवळेपणा किंवा इतर वर्ण, चालण्याची पद्धती अशा वेगवेगळ्या भावांकडे वैद्य म्हणून आपण बघत असतो. व्रण, केसांच्या तक्रारी, त्वचेच्या तक्रारी, कुष्ठ विकार यामध्ये दर्शन परीक्षेद्वारे योग्य निदानापर्यंत पोचायला मदत होते. कुष्ठात त्वचेचा वर्ण कृष्ण आहे, अरुण आहे का श्वेताभ आहे हे पाहून त्या त्या विकारांतील दोषांचा अंदाज यायला मदत होते.

**नाडी परीक्षा** ही बृहत्त्रयी, लघुत्रयी यापैकी योगरत्नाकर, शारंगधर संहिता यामध्ये खोलात वर्णन केली आहे. नाडी परीक्षेतून येऊ घातलेला ताप, रोगामध्ये कुठल्या अवयवाची विकृती झाली आहे, दोषांचे वृद्धीक्षय याचे अंदाज येतात. नाडीवरून साम आणि निराम अवस्था कळायला मदत होते.

**मल आणि मूत्र परीक्षण** हे आपल्या पद्धतीने बरेचदा केले जात नाही. बांधलेला मल रोजच्या रोज सकाळी साफ होणे हे अग्नी नीट असल्याचे द्योतक आहे. आवेसारखा मल, चिकट मल, खूप पातळसर मल, ज्यातून अपक्व अन्न पडते असा मल, मलाचा खडा या सर्व लक्ष द्यायच्या गोष्टी आहेत. ग्रहणी व्याधी हा अनेक व्याधींमध्ये लक्षणात वर्णन केला आहे. तसेच ग्रहणी या निदानात अनेक व्याधी लक्षणांची मुळे दिसतात. अशा वेळी हेतू आणि संप्राप्ति याचा विचार महत्वाचा ठरतो. उदाहरणार्थ उदावर्त व्याधीमध्ये हृद्रोग, ग्रहणी, मानसरोग, सर्दी अशी विविध लक्षणे दिसतात. आपल्याकडे हे व्याधी लक्षणे घेऊन रुग्ण येतात तेव्हा आलेला व्याधी हा स्वतंत्र आहे का परतंत्र याचा विचार करणे आवश्यक राहते. ऑटीझम, ADHD, विविध पद्धतीचे मनोरोग, मनोवह स्रोतसाच्या निगडीत लक्षणे दिसणे अशा अनेक संहितेमध्ये निदान स्थानात वर्णन न केलेल्या व्याधींच्या लक्षणांचा सखोल अभ्यास असला तर जवळच्या आयुर्वेदीय निदानापर्यंत पोचणे सोपे जाते.

| त्रिविध परीक्षा | अष्टविध परीक्षा | दशविध परीक्षा | निदान पंचक |
|---|---|---|---|
| दर्शन(प्रकृती, केस, त्वचा, प्रभा, छाया, वर्ण इत्यादि गोष्टी) | नाडी(उष्ण, शीत, मन्द, जलद, गुरु, लघु इत्यादि) | प्रकृती(दोषज) | हेतू |
| स्पर्शन(उष्ण, स्पर्श, खर, कठीण, कर्कश, उत्सेध) | मल (साम, निराम, वर्ण परीक्षा, संहनन, दिवसाचे मल वेग) | विकृती(हेतू, दोष, दूष्य, प्रकृती, देश, काल, बल, लिंग) | पूर्वरूप |
| प्रश्न(व्याधीचा कालावधी, पूर्व इतिहास, लक्षणांची तीव्रता, आणि बाकी अष्टविध, दशाविध परीक्षेमधील विविध परीक्ष्य भाव) | मूत्र | सार(धातूसार, सत्वसार) | रूप/लक्षण/लिंग |
| | जिव्हा(साम, निराम, वर्ण, आरक्तता) | संहनन(हीन, मध्यम, उत्तम) | उपशय अनुपशय |
| | शब्द(क्षाम, जर्जर, खर, मंद) | प्रमाण | संप्राप्ति |
| | स्पर्श(रुक्ष, स्निग्ध, मृदू, शीत, उष्ण) | सत्व(अवर, मध्यम, प्रवर) | |
| | दृक | सात्म्य(आहार, विहार, ओकसात्म्य) | |
| | आकृती | आहार | |
| | | व्यायाम | |
| | | वय(बाल, मध्य, वृद्ध) | |

**विकृती परीक्षण**

रुग्णाला झालेल्या व्याधीचे परीक्षण करताना व्याधीची उत्पत्ती कुठल्या हेतूमुळे झाली आहे यावरून व्याधीच्या संप्राप्तीचा अंदाज यायला मदत होते. हेतू, पूर्वरूप, रूप, उपशय, संप्राप्ति या क्रमाने विकृतीचे आयुर्वेदीय दोष दूष्य ओळखण्याच्या दृष्टीने मदत होते.

**विकृतितश्चेतिविकृतिरुच्यतेविकारः|तत्रविकारं हेतु-दोष-दूष्य-प्रकृति-देश-काल**

**बलविशेषैर्लिङ्गतश्चपरीक्षेत| च.वि.८/१०१**

लक्षणे घेऊन दवाखान्यात रुग्ण आल्यावर त्यात दिसणाऱ्या लक्षणात कुठल्या दोषांचे प्राबल्य दिसत आहे याचा विचार सर्वप्रथम करायला लागतो. एखादा रुग्ण डोके दुखत आहे हे लक्षण घेऊन आला असता त्याचे डोके हे पित्ताने दुखत आहे, खूप विचार केल्याने वात प्रकोपाने दुखत आहे का खूप वेळ एसी मध्ये बसल्यामुळे कफाने दुखत आहे याचा विचार आपल्याला वैद्य म्हणून करायला लागतो. लक्षणांबाबत बोलायचे तर दोष दूष्य संमूर्च्छना समजून घेणे महत्त्वाचे ठरते. ही समजून घेताना हेतूंचा सखोल अभ्यास असेल तर दिसणाऱ्या लक्षणांची संप्राप्ति ही कुठल्या व्याधीच्या आसपास जात आहे याचा अंदाज यायला मदत होते. प्रत्येक वेळी डोकेदुखी ही शिररोग, अर्धावभेदक, सूर्यावर्त यापैकीच असेल असे नाही. "अर्श" या व्याधीचे सामान्य लक्षण म्हणूनही हे लक्षण ग्रंथात आले आहे. सध्या दिसणाऱ्या व्हायरल संसर्गामध्ये हे लक्षण पूर्वरूप म्हणून दिसते. अशा वेळी आयुर्वेदाचे सौंदर्य हे त्याच्या निदान पंचकात आहे. हेतूंचा आणि लक्षण समुच्चयाचा योग्य विचार करून आपल्याला असणाऱ्या लक्षणांची संप्राप्ति कुठल्या रोगाच्या जवळपास जाऊ शकेल याचा अंदाज यायला नक्कीच मदत होते.

हेतूंचा विचार करताना आपण सर्वांनीच बदलत्या युगातील आजार उत्पन्न करणाऱ्या नवीन कारणांचा विचार चिकित्सेमध्ये निश्चितच करायला हवा. नवनवीन आजारांना तोंड देत असताना सगळ्यांमध्ये एक साधारण गोष्ट दिसते ती म्हणजे रोजच्या रोज या ना त्या स्वरूपात आपल्या पोटात जात असणारी विषे. ही विषे फळे आणि भाज्या यातून जाणारी खते, आम्लधर्मी वायु आणि रसायनांमुळे मुळे रोजच्या रोज शरीरात घेतले जाणारे हवा आणि पाणी, पॅक केलेल्या अन्नामध्ये शेल्फ लाईफ वाढावे म्हणून घातलेले प्रिझर्वेटिव्हस्, वेळच्या वेळी जेवण न केल्याने, व्यायाम नसताना वेळी अवेळी जास्त खाल्ले गेलेले शरीरात साचत गेलेले न पचलेले अन्न विषार, दिवसा झोपणे आणि शरीराला अहितकर असे वारंवार खाणे या सगळ्यातून शरीरात साचत जातात. पाश्चात्य वैद्यकशास्त्राची औषधे, चांगल्या गट फ्लोराला देखील मारणाऱ्या अँटीबायोटिक्स यांचा अवास्तव वापर आणि तो नीट होण्यासाठी लागणारे व्यायाम आणि पथ्यकर आहार विहार याचा अभाव ही सर्व कारणेदेखील काही काळाने शरीरावर विषवत् परिणाम दाखवत असतात.

**कृत्रिमं गरसंज्ञं तु क्रियते विविधौषधैः। हन्ति योगवशेनाशु चिराच्चिरतराच्च तत्॥**

**शोफपाण्डूदरोन्माददुर्नामादीन् करोति वा। अष्टांगहृदय उत्तरस्थान ३५/६**

सध्याच्या भाषेत बोलायचे तर सगळ्यांच्या शरीरात हे “inflammatory” बदल होताना दिसत आहेत. यामध्ये सूक्ष्म जीवाणूंच्या भूमिका नसतात, हे “निज” व्याधी आपल्या शरीरात होत जाणाऱ्या धातू बदलांना वेळीच आळा घालण्यासाठी प्रयत्न न केल्याने झालेले परिणाम असतात. हे विषार साचत जाण्याने उदर, मूळव्याध, वेगवेगळे सूज मनोरोग इत्यादि विविध आजार होतात असे आयुर्वेदात वर्णन आहे. अशी कारणे रुग्णात दिसत असल्यास केवळ लक्षणांकडे लक्ष देऊन तात्पुरती औषधे न देता विष चिकित्सेचा तसेच रसायनांचा विचार त्या रुग्णात करता येईल.

**विकारबोध सहाय्यकर भाव**

विकार प्रकृती, अधिष्ठान आणि विकार समुत्थान असा त्रिविध बोधसंग्रह चरकाचार्यांनी सांगितला आहे.

**तस्माद्विकारप्रकृतीरधिष्ठानान्तराणि च|समुत्थानविशेषांश्च बुद्ध्वा कर्म समाचरेत्|| चरक सूत्रस्थान १८/४६**

विकारप्रकृती-अधिष्ठान-समुत्थान ही संकल्पना जी अनुक्त व्याधीच्या अभ्यासाची मूलभूत आहे ती नव्याने निर्माण झालेल्या रोगांचा अभ्यास करण्यासाठी आणि त्यांचे निदान आणि उपचार मिळविण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. येथे आपण अनुक्त व्याधीची संकल्पना समजून घेण्यावर आणि त्यावरील उपचारासाठी उपयोगी ठरणाऱ्या आयुर्वेद सिद्धांत विचारांवर लक्ष केंद्रित करत आहोत.

**विकार प्रकृती**

चरकोक्त व्याधी प्रकारांमध्ये निज आणि आगंतु अशा दोन प्रकारे व्याधी भेद वर्णन केला आहे. इतरही अनेक प्रकारांनी व्याधीभेद केले आहेत ज्याचा वापर चिकित्सा करताना, रोगाचे साध्यासाध्यत्व जाणून घेताना आपण करत असतो. विकार प्रकृती जाणून घेताना दोष आणि व्याधी घटक या दोन्हीचा विचार करणे अनुक्त व्याधीमध्ये उपयोगी ठरते. एकदोषज, द्विदोषज, का सान्निपातिक दोष व्याधी लक्षणात दिसत आहेत, दोषांची अंशांश कल्पना आणि त्या दोषाचा प्रकोप कुठल्या गुणामुळे झाला आहे याबद्दल माहीत करून घ्यायला लागते. उदाहरणार्थ पित्ताशयात होणारे खडे किंवा गॉलस्टोन या मागे बरेचदा पित्ताचा उष्ण तीक्ष्ण गुण कारणीभूत असतो, या उलट मायग्रेन सारख्या आजारात वातज शिरःशूल किंवा पित्तज ग्रहणी हेतूंमुळे झालेले अजीर्ण आणि द्रव, उष्ण गुणाने झालेला पित्त प्रकोप ही कारणे दिसतात. दोष दूष्य समान असले तर व्याधी आशुकारी आहे का दीर्घकालीन, त्याच्या हेतूमधून दोषात्मक प्रकोपाचे कारण कुठले होते त्यानुसार दोषांचा विचार करणे महत्त्वाचे ठरते. उदाहरणार्थ शोथ आणि विसर्प या दोघांच्या संप्राप्तीबाबत पाहिले तर दोष दूष्य समान असून विसर्पामधे उष्ण विदाही हेतू हे प्राधान्याने लक्षात घ्यायला लागतात. त्याचा शीघ्रकारी स्वभाव हा देखील विसर्पाच्या निदानापर्यंत पोचायला वैद्याला मदत करतो.

**प्रमाण परीक्षा** ही विकृती परीक्षणापासून ते औषध उपाय योजना ठरवताना देखील उपयोगी ठरते. आप्तोपदेश, प्रत्यक्ष, अनुमान आणि युक्ती प्रमाण या परीक्षा रुग्ण परीक्षेत उपयुक्त ठरतात. आपण CT स्कॅन , एम.आर.आय, एक्स-रे या गोष्टी प्रत्यक्ष प्रमाण अंतर्गत माहिती करून घेऊ शकतो. या विविध चाचण्यांमुळे अजून खोलात व्याधी प्रसाराचा अंदाज येऊ शकतो. विविध ग्रंथ, केसच्या नोंदी, नवीन ग्रंथ तसेच या सगळ्याचा विचार आणि वापर करून केलेली योजना अनुक्त व्याधी चिकित्सेत मोठी भूमिका बजावतात.

**अधिष्ठान**

अधिष्ठान म्हणजे जिथे व्याधीची उत्पत्ती झालेली दिसते. त्या त्या अधिष्ठानात कुठला दोष वाढलेला आहे यावरून त्या व्याधीच्या साध्यासाध्यतेचा अंदाज येतो. चिकित्सा करताना देखील श्लेष्मस्थानात झालेला वात प्रकोप किंवा वात स्थानात झालेला श्लेष्म प्रकोप यानुसार रुक्ष स्निग्ध किंवा स्निग्ध रुक्ष चिकित्सा कर्म ठरवणे सोपे जाते. वर्णन केलेले विविध सामान्यज आणि नानात्मज विकार यातून दोषांचे आधिक्य आणि संप्राप्ति भंग विचार करणे सोपे जाते. कोविड व्याधीमध्ये आधी ज्वर का आधी कास यावरून आमाशय मूळ धरून दीपन पाचन चिकित्सा करायची का कास व्याधी धरून अधोवात आणि श्वसन संस्थेवरील चिकित्सा करायची हा चिकित्सक्रम आपण लक्षणानुसार ठरवला होताच.

**समुत्थान**

समुत्थान म्हणजे व्याधि ज्या कारणामुळे उत्पन्न झाला ते कारण. यामध्ये व्याधी कोणत्या ठिकाणाहून उत्पन्न झाला आहे हा विचारही केला जातो. आपल्याकडे येणाऱ्या रुग्णांमध्ये केवळ पेपर वर वाढलेले आकडे कमी करण्यासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या भरपूर आहे. प्रत्येक वेळी त्यांच्यामध्ये लक्षणे दिसतात असेही नाही. निरनिराळ्या चाचण्या आणि त्यांचे पुढे होत जाणाऱ्या व्याधीतील परिवर्तन या माहितीचा वापर आपण अशा ठिकाणी विचार करण्यासाठी करू शकतो. उदाहरणार्थ एखाद्या व्यक्तीमध्ये अष्टांगहृदय निदानस्थानात वर्णन केलेली वात प्रकोपाची कारणे, चिंता, शोक या गोष्टी आणि वात प्रकृती शरीर असेल तर अशा व्यक्तीत शुगरमुळे दिसणाऱ्या विविध लक्षणांत न्यूरोपॅथी व्हायची शक्यता जास्त राहते. अशा वेळी हा अंदाज घेऊन केवळ अपतर्पण चिकित्सा देत न राहता स्नेहपान किंवा वसंत कुसुमाकर सारखे एकांगी वात न वाढवणारे उपचार आपण करत असतो. या ठिकाणी मूळ कारण, त्याचे अधिष्ठान आणि दोष दूष्य सम्मूर्च्छना या विचाराने औषधांचे निर्णय घेतले जातात. प्रत्येक व्याधीला नाव देता न येऊनही औषधी विचार आयुर्वेद सिद्धांतावर करता येणे हे आयुर्वेद उपचारांचे सौंदर्य आहे आणि आयुर्वेदाचे शाश्वतत्व अशा गोष्टीतून सिद्ध होत राहते.

**चिकित्सा विचार**

अनुक्त व्याधी चिकित्सा विचारापर्यंत कशा पद्धतीने जाता येईल ते आपण पाहिले. आयुर्वेदीय विचाराने निदानापर्यंत पोचले की अनुक्त व्याधीमध्ये चिकित्सेचा विचार केला जायला मदत होते.

**हेतुलिङ्गौषधज्ञानं स्वस्थातुरपरायणम्|त्रिसूत्रं शाश्वतं पुण्यं बुबुधे यं पितामहः||चरक सूत्रस्थान १/२४**


कुठल्या हेतूने कुठले दोष प्रकुपित होतात याची यादी अष्टांग हृदय निदानस्थान पहिल्या अध्यायातून कळते. माझ्याकडे एक रुग्णा आली होती. रजोनिवृत्तीनंतर तिला क्लम, अंगसाद, भारवृद्धी, पायावर त्वक् विकृती अशी विविध लक्षणे उत्पन्न झाली होती. रिपोर्टमध्ये लोह सप्लिमेंट घेऊनही हिमोग्लोबिन तेवढ्यापुरते वाढून परत कमी होत होते. आहार विहार चौकशी करता तिला खडू, भाजकी माती किंवा पाटीवरची पेन्सिल खायची सवय होती असे समजले. "कृमिजन्य पांडू" असे निदान करून केवळ नेहमीचे केवळ लोहाचे कल्प न देता कृमीकुठार, विडंगारिष्ट चालू केले. स्थौल्याचा विचार करून आधीच ताप्यादि हा बृहण कल्प न वापरता गोमूत्र हरितकी सारखा अपतर्पण, स्रोतोशोधन करणारा, कृमी, शोथ आणि पांडू या तिन्ही व्याधींवर जाणारा कल्प वापरला. नंतर नवयास लोह आणि वजन आटोक्यात आल्यावर मग ताप्यादि लोहाची योजना केली. तिची सगळी लक्षणे तर कमी झालीच या बरोबर वारंवार उपटणारा हा त्रास कायमसाठी थांबला.

नवीन आजार आल्यावर त्याच्या साध्यासाध्यतेचा विचार करताना "अतुल्यदूष्यदेशर्तुप्रकृतिः" हा सुखसाध्य व्याधीचा गुण आपल्याला माहित आहे. औषधाचा विचार करताना देखील रुग्णबल आणि व्याधीबल याचा विचार करून औषधांचे प्रमाण ठरवले जाते. सध्याच्या काळामध्ये ग्राम्य आहार, विषविचार आणि जनपदोध्वंस या तीन गोष्टींचा विचार नवीन आजार येता केला जातो. या व्याधींचे निदान करताना नवीन संशोधने, त्यातून पुढे येणारे त्या त्या विशिष्ट रोगाबद्दलचे ज्ञान आणि तिथे अगदी पझल पीस सारखे बसत जाणारे आपले आयुर्वेदीय सिद्धांत याचा उत्तम फायदा रुग्णांना होतो. हिपॅटायटिस बी, विविध ऑटो इम्यून आजार यामध्ये आधुनिक चाचण्यांचा वापर करून रुग्णांना त्यांच्या रोगांच्या गंभीरतेबद्दल अंदाज दिला जाऊ शकतो.

**त्यागाद्विषमहेतूनां समानां चोपसेवनात्|विषमा नानुबध्नन्ति जायन्ते धातवः समाः||३६||चरक सूत्रस्थान १६/३६**

अनुक्त व्यधिचिकित्सा करताना हेतूंचा त्याग हे आपल्याला रुग्णांना सांगणे महत्वाचे असते. व्याधींचा दूरगामी उपशय आपल्याला हवा असेल तर स्वभावोपरम वादानुसार हेतुवैषम्याने झालेले विषम देहधातू हेतुसाम्य प्रस्थापित केल्यावर परत तसेच राहण्यासाठी हेतूंचा पूर्ण त्याग करणे का महत्वाचे आहे हे रुग्णांना समजावून सांगायला लागते. यामुळे झालेला व्याधींचा पुनरुद्भव टळायला मदत होते. लहान मुलांमध्ये वारंवार होणाऱ्या सर्दी

खोकल्यामागे कृमी हे निदान असते. पेपरवर वाढलेले कोलेस्टेरॉल हे बरेचदा कफज ग्रहणीची लक्षणे दाखवते. केमो आणि रेडिएशन मुळे होणारा केशशात कमी करताना केवळ अस्थि धातू पोषण करणारी द्रव्ये न वापरता रक्तावर काम करणारी माक्षिक, दूर्वा, प्रवाळ या सारखी औषधे, रक्तपित्त व्याधींमधील फलांबू सारख्या कल्पना वापरता येतात. अनुक्त व्याधीमध्ये पथ्य सांगताना देखील नवीन फळे, नवीन भाज्या आणि त्यांची नवीन बियाणे या सगळ्याचा विचारही महत्वाचा ठरतो. कोंबडीचे अंडे हे गुरू, मधुर, पुष्टीदायक सांगितले असले तरी सध्या ज्या पद्धतीची इंजेक्शन आणि हार्मोन कोंबड्यांना टोचले जात आहेत त्याचा विचार करणे आवश्यक आहे. अंडे हे गुणाने शीत सांगितले असले तरी रुग्णांमध्ये मात्र ते उष्ण गुणाने काम करताना दिसते. त्यात केले गेलेले रासायनिक बदल हा एक मोठा मुद्दा आपल्या व्याधी पथ्य विचार करताना भूमिका बजावत असतो. RO फिल्टर घरोघरी बसल्याने सूक्ष्म पोषकांश मिळणे बंद झाले आहे. त्यातून घटलेली अन्नाची सकसता प्रतिकारशक्ती कमतरता, अंगदुखी, जखम भरून यायला वेळ लागणे, वारंवार तोंड येणे, थकवा अशी विविध लक्षणे उत्पन्न करतात. हे रुग्ण आपल्याकडे ही लक्षणे घेऊन आली असता आपल्याला केवळ निदान स्थानात ते बसवता येणे अवघड असते, अशा वेळी या नवीन कारणांचा विचार आणि मग त्या संलग्न उपाय योजना आपल्या दोष धातू मल ,स्रोतस, दीपन पाचन इत्यादि क्रिया या आधारावर करणे भाग असते.




सध्या आपल्या समोरचे आव्हान आहे ते म्हणजे नवीन हेतू, त्याने उत्पन्न होत जाणारे नवनवीन आजार आणि त्यासाठी आयुर्वेदीय निदान करून रुग्णांना उपशय देणे. कोव्हीडमध्ये मोठ्या स्तरावर रेमडेसिवीर, स्टिरॉइड सारख्या औषधांचा मारा केला गेला हे आपण सगळे जाणतो. या व्यतिरिक्त आयुर्वेदाला बाजूला ठेवून दुष्परिणामांचा अभ्यास करण्याच्या आधीच जोरदार केले गेलेले लसीकरण याचे परिणाम सध्या सगळे भोगत आहेत. AVN, वाढलेल्या कोलेस्टेरॉल आणि शुगर पातळ्या, मानसिक अस्वास्थ्य, वारंवार होणारे आजारपण असे विविध आजार या साथीनंतर वाढले. या सगळ्या ठिकाणी आयुर्वेदाची कास धरलेले लोक मात्र तगले. भारतासारख्या देशाची लोकसंख्या इतकी

प्रचंड असून देखील मृत्युदर मात्र कमी असण्याचे कारण आपले पारंपरिक खाणे आणि आयुर्वेदाने दिलेले मोठ्या स्तरावरचे चिकित्सिय योगदान हे नक्कीच आहेत. कोविड साथीत कित्येक रुग्णांचे जास्त नुकसान हे हॉस्पिटलमध्ये सरसकट भरती केल्याने तिथल्या औषधांनी आणि वातावरणाने झाले. ही रुग्ण आपल्याकडे आले तेव्हा त्यांची सरसकट संप्राप्ति ही बदलून या नवीन हेतूंचा विचार आपण सगळ्यांनी केला. या बरोबरीने हेतूंचा पूर्णतः त्याग, श्वास व्याधीमध्ये आलेले "आक्तं लवण तैलेन.." या सूत्रांचा वापर आणि ज्वरामधील विविध काढे याचाही वापर केला गेला. रोगाच्या प्रतिबंधासाठी आपल्या रसायन औषधींचा वापर, नस्य सारख्या कल्पना आणि लसीचे दुष्परिणाम कमीतकमी ठेवायला सांगितले गेलेले स्नेहपान इत्यादि उपाय रोगनाश आणि रोगप्रतिबंध अशा ठिकाणी आयुर्वेदाचा ठसा उमटवून गेले.

इंद्रियस्थानात वर्णन केलेल्या अरिष्टांचा नवीन व्याधींमध्ये विचार करणे हे आपल्याला एक वैद्य म्हणून चिकित्सेचा अंदाज यायला आणि तो अंदाज रुग्णाला देऊन त्याचा आपल्यावर विश्वास वृद्धिंगत व्हायला मदत करत असतो. या सगळ्यात चरकाचार्य जे म्हणतात तेही महत्त्वाचे आहे.

**"नहि ज्ञानावयवेन कृत्स्ने ज्ञेये विज्ञानमुत्पद्यते| चरक विमान ७/४"**

म्हणजेच प्रत्येक व्याधी चिकित्सा विचार करताना एकच घटकाचा विचार करून व्याधीचे पूर्ण ज्ञान होत नाही. अनुक्त व्याधींवर काम करताना ही खबरदारी बाळगणे आपण लक्षात ठेवले पाहिजे.

**वैद्य म्हणून आपले कर्तव्य**

कुठलाही नवीन व्याधी घेऊन रुग्ण येतो तेव्हा औषधी उपचार देताना विविध व्याधींमध्ये आलेले कल्प वापरता येतात. संप्राप्ति, दोषांची गती आणि दूषित झालेले दूष्य घटक या दोन गोष्टींवर चिकित्सा कल्प ठरला जातो. माननीय वैद्य मा.वा. कोल्हटकर यांचा एक अतिशय चांगला गुण म्हणजे आपल्या शास्त्राला जे जे संलग्न उपयुक्त गोष्टी असतील त्यांचा अवलंब करणे. रसशास्त्र हे पूर्णतः आयुर्वेद बृहत् आणि लघुत्रयी या मध्ये वर्णिलेले नसले तरी रसशास्त्रीय ग्रंथ बघता त्यात वर्णन केलेल्या रोग वर्णनावरून ही आयुर्वेदाचीच पुढे विकास होत गेलेली शाखा आहे हे लगेच लक्षात येते. इमर्जन्सी मेडिसिन किंवा ताबडतोब उपचार या क्षेत्रात रसशास्त्राचे महत्व अनन्य साधारण आहे. "अल्पमात्रम् महावेगं।।" अशा गुणांचे रसशास्त्रीय कल्प जेव्हा वाहक वनस्पतीच्या पाठीवर बसून योग्य ठिकाणी काम करतात तेव्हा त्याचे फळ हे आपल्या सर्वांना पेशंटच्या डोळ्यातून आणि बोलण्यातून मिळत असते.

या सगळ्याच्या मुळाशी "आयुर्वेद विचार" हा फार महत्वाचा आहे. लक्षणांवरून दोष दूष्य हेतू लक्षण संप्राप्ति याचे ज्ञान करून घेत असतानाच त्यावर उपाय करताना "युक्ती" चा वापर केला गेला पाहिजे. विविध औषधी वनस्पती, कल्प आणि कल्पना यांचा सुयोग्य वापर करायला "योजकस्तत्र दुर्लभः|" अशी परिस्थिती येता कामा नये. या

सगळ्यांमध्ये काम केलेल्या व्यक्तींनी त्यांच्याकडे पाहिलेल्या, चिकित्सा केलेल्या केसेसचे खोलात लिखाण करून ठेवणे पण पुढच्या पिढ्यांच्या दृष्टीने सहाय्यकर ठरेल. अशाने पुढे पुढे येत जाणारे नवनवीन अनुक्त व्याधी जास्त चांगल्या पद्धतीने हाताळणे नवीन वैद्यांना देखील सोपे जाईल आणि आयुर्वेद अधिकाधिक पद्धतीत समाजोपयोगी ठरेल. अनुक्त व्याधी, नवनवीन साथीचे आजार, घसरत चाललेली जीवनशैली आणि विषवत् परिणाम करत जाणारे निरनिराळे नैसर्गिक घटक याच्यावर मात करायची असेल तर आपण आपला दृष्टिकोन उदात्त ठेवून केवळ समाजआरोग्य हिताच्या दृष्टीने आपल्या शास्त्राद्वारे जे जे करता येणे शक्य असेल ते करणे हे एक वैद्य म्हणून आपले आद्य कर्तव्य आहे असे मला वाटते.